RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ११, अंक ३१] शुक्रवार, ऑक्टोबर ३, २०२५/आश्विन ११, शके १९४७ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ६०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**नगर विकास विभाग,**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ ऑक्टोबर २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.**

क्रमांक एमसीओ-२०२५/प्र.क्र.२९०/नवि-१४.—ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०२२ (सन २०२२ चा महा. २१) अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) यामध्ये सुधारणा करण्यात आली असून, नगरपंचायतींच्या निवडणुकांकरीता, महाराष्ट्र शासन, राज्य निवडणूक आयुक्तांच्या मान्यतेने **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, प्रभागांची संख्या निश्चित करेल आणि त्यांच्या सीमा निर्दिष्ट करेल अशी तरतूद करण्यासाठी सुधारणा करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ३४१ब चे पोट-कलम (१) नुसार नगरपंचायतींमधील थेट निवडून येणाऱ्या नगरपंचायत सदस्यांची संख्या सतरा असेल ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ३४१ब पोट-कलम (१) मधील तरतुदीनुसार नगरपंचायतींमध्ये निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या १७ अशी निश्चित करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त तरतुदी अंमलात आणण्याच्या उद्देशाने महिलांकरीता तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यातील व्यक्तींकरीता नगरपंचायतींमधील प्रभागांमध्ये नगरपंचायत सदस्यांच्या राखीव जागांचे वाटप करण्याच्या आणि त्या चक्रानुक्रमे फिरवण्याच्या संबंधात नियम करणे इष्ट वाटते ;

आणि ज्याअर्थी, याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यासाठी या नियमांची पूर्व प्रसिद्धीची शर्त काढून टाकणे, जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) कलम १० आणि कलम ३२१ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि यासंदर्भात त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून तसेच यासंदर्भात अगोदर काढलेल्या इतर सर्व अधिसूचना, आदेश, नियम, इत्यादींचे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन, राज्य निवडणूक आयुक्तांशी विचार विनिमय केल्यानंतर, याद्वारे पुढील नियम करीत आहेत :–

१. **संक्षिप्त नाव** :– या नियमांना महाराष्ट्र नगरपंचायत (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पद्धत) नियम, २०२५ असे म्हणण्यात येईल.

२. **व्याख्या** :– (एक) या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर ;

(अ) " अधिनियम " याचा अर्थ, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा मुंबई महा. ४०) असा आहे;

(ब) " प्रभाग " याचा अर्थ, पंचायत सदस्यांना निवडून देण्याच्या प्रयोजनार्थ, नगरपंचायतींचे क्षेत्र ज्या निवडणूक मतदार संघांमध्ये विभागलेले असेल त्यांच्यापैकी निवडणूक मतदार संघ, असा आहे.

(दोन) या नियमांमध्ये वापरलेले, परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्द प्रयोग यांना अधिनियमामध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

**३. अनुसूचित जातींसाठी राखून ठेवलेल्या जागांचे वाटप करण्याची व त्या चक्रानुक्रमे फिरविण्याची पद्धत :–**

(१) अनुसूचित जातींच्या व्यक्तींसाठी नगरपंचायतींच्या सदस्यांच्या जागा राखून ठेवण्याकरिता, प्रथम प्रभागांची मांडणी ही, ज्या प्रभागातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची टक्केवारी त्या प्रभागातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत सर्वाधिक असेल अशा प्रभागापासून सुरुवात करून, उतरत्या क्रमाने करण्यात येईल ;

(२) त्यानंतर, अनुसूचित जातींच्या लोकसंख्येची टक्केवारी सर्वाधिक असलेल्या प्रभागापासून सुरुवात करून उतरत्या क्रमाने जागा अनुसूचित जातींसाठी नेमून देण्यात येईल ;

परंतु, नगरपंचायतींच्या सर्व प्रभागांमध्ये असे आरक्षण चक्रानुक्रमे फिरवले जाईपर्यंत, ज्या प्रभागात अनुसूचित जातींसाठी अशी कोणतीही जागा यापूर्वी राखून ठेवलेली नव्हती अशा प्रभागांकरीता नगरपंचायतींच्या पुढील निवडणुकांमध्ये शक्य होईल तेथवर, या पोट नियमाखाली राखून ठेवलेल्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्यात येतील.

४. **अनुसूचित जमातींसाठी राखून ठेवलेल्या जागांचे वाटप करण्याची व त्या चक्रानुक्रमे फिरविण्याची पद्धत** :–

(१) अनुसूचित जमातीच्या व्यक्तींसाठी नगरपंचायतींच्या सदस्यांच्या जागा राखून ठेवण्याकरिता, प्रथम प्रभागांची मांडणी ही, ज्या प्रभागातील अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येची टक्केवारी त्या प्रभागातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत सर्वाधिक असेल अशा प्रभागापासून सुरुवात करून, उतरत्या क्रमाने करण्यात येईल.

(२) त्यानंतर, अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येची टक्केवारी सर्वाधिक असलेल्या प्रभागापासून सुरुवात करून उतरत्या क्रमाने जागा अनुसूचित जमातींसाठी नेमून देण्यात येईल ;

परंतु, नगरपंचायतींच्या सर्व प्रभागांमध्ये असे आरक्षण चक्रानुक्रमे फिरवले जाईपर्यंत, ज्या प्रभागात अनुसूचित जमातींसाठी अशी कोणतीही जागा यापूर्वी राखून ठेवलेली नव्हती अशा प्रभागांकरीता नगरपंचायतींच्या पुढील निवडणुकांमध्ये शक्य होईल तेथवर, या पोट नियमाखाली राखून ठेवलेल्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्यात येतील.

५. **एकाच प्रभागात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची जागा येत असल्यास :–** वरील नियम ३ व ४ नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या जागांचे वाटप केल्यानंतर जर एकच प्रभाग अनुसूचित जाती व जमातीकरीता आरक्षित होत असेल तर :–

(*i*) त्या प्रभागामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यापैकी ज्या प्रवर्गाची लोकसंख्या जास्त असेल, त्या प्रवर्गाकरीता तो प्रभाग आरक्षित होईल आणि दुसऱ्या प्रवर्गाचे आरक्षण उतरत्या क्रमाने पुढील प्रभागात देण्यात येईल ;

(*ii*) आणि जर, प्रभागातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या समान असल्यास तो प्रभाग अनुसूचित जमातीकरीता आरक्षित होईल, कारण अनुसूचित जमातीची लोकसंख्या ही विशिष्ट क्षेत्रामध्येच समाविष्ट असते.

**६. एकापेक्षा अधिक प्रभागांमध्ये त्या प्रवर्गाच्या लोकसंख्येची समान टक्केवारी असल्यास :—** नियम ३ व ४ नुसार उतरत्या क्रमाने प्रभागांची मांडणी केल्यानंतर, सदर नियमातील तरतुदीनुसार अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी आरक्षित प्रभाग निश्चित करेल. मात्र, जर ज्या प्रवर्गातील शेवटच्या आरक्षित जागेसाठी प्रभाग निश्चित करताना, दोन अथवा अधिक प्रभागांमध्ये त्या प्रवर्गाच्या लोकसंख्येची टक्केवारी समान असल्यास, त्या प्रभागांपैकी कोणत्या प्रभागात आरक्षण देय होईल तो प्रभाग चिठ्ठ्या टाकून निश्चित करण्यात यावा.

**७. नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागांचे वाटप करण्याची व त्या चक्रानुक्रमे फिरविण्याची पद्धत :-**

(१) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरीता आरक्षित जागा निश्चित केल्यानंतर उर्वरित प्रभागांमधून सोडत काढून नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांचे वाटप करण्यात येईल.

(२) त्या पुढील निवडणुकीमध्ये, जे प्रभाग अगोदरच्या निवडणुकीमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरीता सोडतीने आरक्षीत झाले होते ते प्रभाग आणि या निवडणुकीमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी आरक्षित झालेले प्रभाग वगळून उर्वरित प्रभागांमधून सोडत काढून नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागा नेमून देण्यात येतील :

परंतु, नगरपंचायतीच्या सर्व प्रभागांमध्ये असे आरक्षण चक्रानुक्रमे फिरवले जाईपर्यंत, ज्या प्रभागात नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी अशी कोणतीही जागा यापूर्वी राखून ठेवलेली नव्हती अशा प्रभागांकरीता नगरपंचायतींच्या पुढील निवडणुकांमध्ये, शक्य होईल तेथवर, या पोट नियमाखाली राखून ठेवलेल्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्यात येतील.

**८. महिलांसाठी जागा नेमून देण्याची व त्या चक्रानुक्रमे फिरविण्याची पद्धत :-**

(१) प्रथम, अनुसूचित जातीतील महिलांसाठी राखून ठेवावयाच्या जागा या, अनुसूचित जातीसाठी राखीव जागा असलेल्या प्रभागांमधून सोडतीने नेमून देण्यात येतील.

(२) यानंतर, अनुसूचित जमातीतील महिलांसाठी राखून ठेवावयाच्या जागा या, अनुसूचित जमातीसाठी राखीव जागा असलेल्या प्रभागांमधून सोडतीने नेमून देण्यात येतील.

(३) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसाठी राखून ठेवावयाच्या जागा या, नागरिकांचा मागास प्रवर्गाकरीता राखीव जागा असलेल्या प्रभागांमधून सोडतीने नेमून देण्यात येतील.

(४) या नियमांच्या प्रारंभानंतरच्या पुढील निवडणुकीमध्ये, शक्य असेल तेथवर, सर्व प्रभागांमध्ये असे महिलांचे आरक्षण चक्रानुक्रमे नेमून दिले जाईपर्यंत, नगरपंचायतींच्या यापूर्वीच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये एखाद्या विशिष्ट प्रवर्गातील महिलांसाठी जेथे अशी कोणतीही जागा नेमून देण्यात आली नव्हती त्या प्रभागांसाठी, त्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव जागा चक्रानुक्रमे नेमून देण्यात येतील.

**९. चक्रानुक्रमासाठी प्रथम निवडणूक :—** ह्या नियमानुसार चक्रानुक्रमाच्या प्रयोजनांसाठी, या नियमांच्या प्रारंभानंतर घेतलेल्या सार्वत्रिक निवडणुका ह्या, प्रथम निवडणूक असल्याचे मानण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रियांका कुलकर्णी-छापवाले,**
शासनाच्या उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 3rd October, 2025.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

No. MCO-2025/C.R.290/UD-14.—Whereas, by the Mumbai Municipal Corporation, Maharashtra Municipal Corporations and Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships (Amendment) Act, 2022 (Mah. XXI of 2022), the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965) (hereinafter referred to as "the said Act") has been amended to provide that for the purposes of elections of the Nagar Panchayats, the State Government with the approval of the State Election Commissioner shall by an order published in the Official Gazette, divide into number of wards and specify the boundaries thereof ;

And whereas, sub-section (*1*) of section 341B of the said Act provides that a Nagar Panchayats shall consist of seventeen directly elected Councillors ;

And Whereas, to give effect to the said provisions, it is considered expedient to frame the rules regarding the manner of allotment and rotation of reservation of seats of Counicllors in wards in the Nagar Panchayat for Women and the persons belonging to the Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Class of citizens ;

And whereas, the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to take immediate action in this behalf by dispensing with the condition of previous publication of these rules ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by section 10 read with section 321 of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965) and of all other powers enabling it in that behalf, and in supersession of all earlier notifications, orders, rules, etc., issued in this behalf, the Government of Maharashtra, after consultation with the State Election Commissioner, hereby makes the following rules, namely :–

**1. Short *title*.—** These rules may be called the the Maharashtra Nagar Panchayats (Manner of Allotment and Rotation of Reservation of Seats of Councillors in Wards) Rules, 2025.

**2. *Definitions*.—** (1) In these rules, unless the context otherwise requires,—

(*a*) "Act" means the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 (Mah.XL of 1965) ;

(*b*) "ward" means the territorial constituencies into which the area of the Nagar Panchayats is divided for the purpose of election of Councillors ;

(2) Words and expressions used in these rules but not defined hereinabove shall have the same meaning as assigned to them in the Act respectively.

**3. *Manner of allotment and rotation of seats reserved for Scheduled Castes*.—**

(1) For reserving seats of Councillors for the persons belonging to the Scheduled Castes, the wards shall be first arranged in descending order, beginning with a ward where the percentage of population of the Scheduled Castes with regard to the total population of such ward is the highest.

(2) Thereafter, seat shall be allotted to the Scheduled Castes, beginning in the descending order with the ward having the highest percentage of population of the Scheduled Castes :

Provided that, the seats reserved under this sub-rule shall be rotated, as far as possible, in the subsequent elections of the Nagar Panchayat, to such wards in which no such seat had been previously reserved for the Scheduled Castes until such reservation is provided in all the wards in the Nagar Panchayat by rotation.

**4.** ***Manner of allotment and rotation of seats reserved for Scheduled Tribes.—***

(1) For reserving seats of Councillors for the persons belonging to the Scheduled Tribes, the wards shall be first arranged in descending order, beginning with a ward where the percentage of population of the Scheduled Tribes with regard to the total population of such ward is the highest.

(2) Thereafter, seat shall be allotted to the Scheduled Tribes, beginning in the descending order with the ward having the highest percentage of population of the Scheduled Tribes :

Provided that, the seats reserved under this sub-rule shall be rotated, as far as possible, in the subsequent elections of the Nagar Panchayat, to such wards in which no such seat had been previously reserved for Scheduled Tribes until such reservation is provided in all the wards in the Nagar Panchayat by rotation.

**5.** ***If Seats of Scheduled Cast and Scheduled Tribe fall in a same ward***:– After the allocation of seats of Scheduled Castes and Scheduled Tribes in accordance with rule 3 and rule 4 above, if seats of Scheduled Castes and Scheduled Tribes are reserved in the same ward, then :–

(*i*) That ward shall be reserved for the category of Scheduled Castes or Scheduled Tribes whose population is more in that ward and the reservation of the other category shall be given in the ward which is next in the descending order ;

(*ii*) And if, the population of Scheduled Castes and Scheduled Tribes in the ward is equal, that ward shall be reserved for Scheduled Tribes because the population of Scheduled Tribes is confined to a particular area.

**6.** ***If more than one ward has same percentage of population of that category :–*** After arranging the wards in descending order as per rules 3 and 4, the reservation for the categories of Scheduled Castes or Scheduled Tribes in the ward shall be determined as per the provisions of the said rules. However, while determining the ward for the last seat to be reserved in that category, if the percentage of population of that category is the same in two or more wards, then the ward to be reserved shall be decided by drawing of lots from amongst those wards.

**7.** ***Manner of allotment and rotation of seats for backward classes of citizens :–***

(1) After the reservation of seats for Scheduled Castes and Scheduled Tribes has been determined, the seats reserved for Backward Class of citizens shall be allotted by drawing lots from the remaining wards.

(2) In the next election, the seats for Backward Class of Citizens shall be allotted by drawing lots from the remaining wards, excluding the wards which were reserved for Backward Class of citizens in the previous elections and the wards reserved for Scheduled Castes and Scheduled Tribes in this election :

Provided that, the seats reserved under this sub-rule shall be rotated, as far as possible, in the subsequent elections of the Nagar Panchayats, to such wards in which no such seat had been previously reserved for Backward Class of Citizens until such reservation is provided in all the wards in the Corporation by rotation.

**8.** ***Manner of allotment and rotation of seats for women.—***(*a*) Firstly, the seats to be reserved for women belonging to the Scheduled Castes shall be allotted by drawing lots from amongst the wards having the seats reserved for the Scheduled Castes ;

(*b*) thereafter, the seats to be reserved for women belonging to the Scheduled Tribes shall be allotted by drawing lots from amongst the wards having the seats reserved for the Scheduled Tribes.

(*c*) thereafter, the seats to be reserved for women belonging to the Backward Class of citizens shall be allotted by drawing lots from amongst the wards having the seats reserved for the Backward Class of citizens ;

(*d*) the seats reserved for the Women in a particular category shall be allotted by rotation, as far as possible, in the subsequent elections to the Nagar Panchayat to the wards where no such seat was allotted to women in that category in the previous elections of the Nagar Panchayat till all the wards are allotted such reservation by rotation.

**9.** ***First election for rotation.***—For the purposes of rotation of seats under these rules, the general election held after commencement of these rules shall be considered as the first election.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRIYANKA KULKARNI-CHHAPWALE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.